# यावल महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

यावल (प्रतिनिधी )येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागातर्फे ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ साहित्यिक वि .वा. शिरवाडकर यांच्या जन्मदिनानिमित्त दिनांक 27 फेब्रुवारी 2021 रोजी मराठी भाषा गौरव दिन ऑनलाईन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा ए पी पाटील होते. याप्रसंगी डॉ. सुधा खराटे यांनी मराठी भाषेच्या वाटचालीची माहिती सादर केली. आपले विचार व्यक्त करताना त्यांनी सांगितले की मराठी ही संस्काराची भाषा आहे .संस्कृतीचे फार मोठे संचित या भाषेमध्ये समाविष्ट आहे. समाजातील सर्वसामान्य माणसं खऱ्या अर्थाने भाषा संवर्धनाचे कार्य करीत असतात. मराठीत विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध आहे .विद्यार्थ्यांनी चांगले ग्रंथ वाचून स्वतःला समृद्ध केले पाहिजे. यावेळी कोमल बोरणारे हिने वि .वा. शिरवाडकर यांच्या साहित्याचा परिचय करून दिला तसेच कवी सुरेश भट यांची मायबोली ही कविता सादर केली.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाश कोळी याने केले तर आभार भावना सोनवणे  हिने मानले. कार्यक्रमास अनेक विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# यावलला राजभाषा दिनानिमित्त कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

यावल, ता. २८ : येथे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागातर्फे ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक वि .वा. शिरवाडकर यांचा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन ऑनलाइन साजरा करण्यात आला. उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी प्रा. डॉ. सुधा खराटे यांनी मराठी भाषेच्या वाटचालीची माहिती सादर केली. प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. आकाश कोळी याने सूत्रसंचालन केले. भावना सोनवणे हिने आभार मानले.

### डांभुर्णीतही राजभाषा दिन

**यावल** : तालुक्यातील डांभुर्णी येथील डॉ. दिवाकर खंडू चौधरी विद्यालयात मराठी राजभाषा दिन ऑनलाइन पद्धतीने उत्साहात साजरा झाला. मुख्याध्यापक उमाकांत महाजन यांनी मराठी विश्वकोषाचे पूजन केले. नफिसा तडवी हिने मराठी कविता गायन केले. उपशिक्षक रवींद्र निळे, मुख्याध्यापक महाजन यांनी मराठी भाषेविषयी माहिती सांगितली.



**यावल : मनसेतर्फे आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना कोरोनायोद्धा सन्मानपत्र देताना चेतन अढळकर.**

### मनसेतर्फे राजभाषा दिन कार्यक्रम

**यावल** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या येथील शाखेतर्फे येथे मराठी राजभाषा दिनानिमित्त कोरोनाकाळात जीवाची पर्वा न करता कर्तव्य बजावणाऱ्या पत्रकार, आरोग्य विभाग, व स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांचा कोरोनायोद्धा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. येथे बाजार समितीचे सभागृहात मनसेचे जनहित जिल्हाध्यक्ष चेतन अढळकर यांच्या अध्यक्षतेखाली सोशल डिस्टन्सिंगचे पालन करीत कार्यक्रम पार पडला. या वेळी शहरातील पत्रकारांना कोरोना योद्धा सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. प्रसंगी पत्रकार डी. बी. पाटील, राजू कवडीवाले, अयूब पटेल, शेखर पटेल, सुनील गावडे, तेजस यावलकर, प्रमोद वाणी यांना सन्मानित करण्यात आले. त्यानंतर आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी डॉ. बी. बी. बारेला, नानासाहेब घोडके, सूर्यकांत पाटील पालिकेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांना कोरोनायोद्धा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी मनसेचे तालुका उपाध्यक्ष श्याम पवार, शहराध्यक्ष किशोर नन्नवरे, अजय तायडे, ऋषिकेष कानडे, आबिद कच्छी, अनिल सपकाळे आदी उपस्थित होते.